# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र १०८

दिनांक- १९/०४/२०२१

## काशिमीरा पो.ठाणे कार्यक्षेत्रात आयपीएल.ट्वेंटी-ट्वेंटी सामन्यात ऑनलाईन बेंटीगवर श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - १ यांची कारवाई.

दिनांक १६.०४.२०२१ रोजी एका फ्लॅटमध्ये आयपीएल.ट्वेंटी-ट्वेंटी सामन्यावर ऑनलाईन बेंटीग चालू असल्याची बातमी गुप्त बातमीदारामार्फत श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, मिरारोड यांना मिळाली.

श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, मिरारोड,यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पोलीस पथकाने फ्लॅट नं.बी-७०१ आकांक्षा बिल्डींग, प्रेमनगर, मिरारोड पुर्व,येथे छापा घातला असता फ्लॅटमध्ये जतिन कमलकुमार चोक्सी, वय-४० वर्षे यास लॅपटॉप व मोबाईलवर आयपीएल.ट्वेंटी-ट्वेंटी मालिकेच्या पंजाब विरूद्ध चेन्नई या सामन्यावर ऑनलाईन क्रिकेट बेटींग खेळत असतांना मोबाईल, लॅपटॉप तसेच एकुण ९५,००० रुपयाच्या मुद्देमालासह रंगेहात पकडण्यात आले आहे.

याबाबत काशिमीरा पो.ठाणे गुरनं. II ३३६/२०२१, मुंबई जुगार कायदा कलम ४(अ), (५) सह २५ (क), इंडियन टेलीग्राफ ॲक्ट १९८५ प्रमाणे दिनांक १७.०४.२०२१ रोजी गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कारवाई श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.जितेंद्र पाटील, सफौ.विनायक मगर, पोहवा.अजय मांडोळे, पोना.संदीप शेळके, पोना.अंकुश पाटील, मपोशि.लतादेवी एक्कलदेवी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner